# उपजिल्हा रुग्णालय कर्जत, जिल्हा - रायगड.

## पदभरती जाहिरात.

दि. 16/3/२०२१

एनआरसी कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरणेकरीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती च्या अधीन राहून थेट मुलाखती दि. 26/०३/२०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वैद्यकिय अधिकारी | MBBS | उपजिल्हा रुग्णालय कर्जत | 60000/- | १ | आरक्षण लागु नाही. | वैद्यकिय अधिकारी अर्हताधारक असुन सॅम बालकांना पोषण पुर्नवसन केंद्रात उपचार देण्याचे प्रशिक्षण घेतलेला असावा. |
| २ | परिचर (स्त्री) | ८ वी पास | उपजिल्हा रुग्णालय कर्जत | 15500/- | १ | अ.जा.-१ (SC-1) | |

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची आहेत.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व उमेदवाराची निवड झालेनंतर नियुक्ती आदेश प्राप्त झालेनंतर उमेदवाराने जिल्हा शल्यचिकित्सकांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल याशिवाय निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व प्रवर्गामध्ये बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. सदर बाबतचे सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी रायगड यांनी राखून ठेवले आहेत.

७) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

८) एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करताना अर्जासोबत, पदांचा प्राधान्यक्रम मुलाखतीचे पुर्वी कार्यालयास सादर करावा.

९) निवड प्रक्रियेतील निवड यादी raigad.nic या वेबसाईट वर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच मेरिट लिस्ट तयार करताना पात्र उमेदवारांच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण + उच्च शैक्षणिक अर्हतेचे गुण + NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन गुणवत्ता यादी तयार करणेत येईल.

११) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र.राआसोम/पदभरती/११६८२-७९२/२०२० दि.२१/०५/२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. जिल्हाधिकारी रायगड यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१३) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील. एमबीबीएस, विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहिल.

१४) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले थेट मुलाखतीकरीता जिल्हा रुग्णालय प्रशिक्षण केंद्र अलिबाग, दि.26/०३/२०२१ रोजी सकाळी ०९.०० ते ११.०० वाजेपर्यंत सादर करावेत. सकाळी ११ नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१५) उमेदवारांनी खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे - १) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) संबंधित पदाकरीता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरण जोडणे बंधनकारक राहील. ३)शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ४) अनुभवाची प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचे २ फोटो ६) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र ६) वयाबाबतचा पुरावा १९) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) याशिवाय नियुक्त आदेश स्विकारताना उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील.

दिनांक :-

ठिकाण :-

10/3/2021

जिल्हा शल्यचिकीत्सक,
रायगड-अलिबाग.